**४थे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात**

नियमीत दिवाणी दावा क्र २६१/२०१४

*दादासो उत्तम बाबर*

वि.

*हरीदास मारुती बाबर वगैरे*

**आदेश निशाणी क्रमांक ५९ खाली**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ३ प्रमाणे प्रतिवादी क्र ५ अनिल लक्ष्मण देशपांडे यांचे वारस रेकार्डवर आणण्यासाठी दाखल केला आहे. वादी यांनी निशाणी क्र. ६० कडे प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रतिवादीनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. वादीचा निशाणी क्र. ५७ कडील अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे तसेच वादीचा निशाणी क्र ५५ कडील विलंब माफीचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र ५ अनिल लक्ष्मण देशपांडे हे दिनांक १९.०६.२०२३ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जात नमुद कायदेशिर वारस आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र ५ यांच्या नावापुढे मयत असे लिहून अर्जात नमुद वारसांची नावे लिहिण्यास व तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या वकीलांनी प्रस्तुतचा अर्ज खरा व कायदेशिर नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदारा यांचे वकील व प्रतिवादी यांचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने प्रस्तुतचा दावा हद्दीखुणा कायम होवून मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी यादी निशाणी क्र ५४ अन्वये प्रतिवादी क्र ५ अनिल लक्ष्मण देशपांडे यांचे मृत्यूप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. निशाणी ५४ वरील मृत्युप्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र ५ हे दिनांक १९.०६.२०२३ रोजी मयत झाल्याची बाब स्पष्ट

होते. अर्जात नमुद वारस हे प्रतिवादी क्र ५ अनिल लक्ष्मण देशपांडे यांचे कायदेशीर प्रतिनीधी असल्याने दाव्याच्या कामी त्यांना सामील करुन घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याउलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेस मदत होणार आहे. त्यामुळे वादीचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्याचे कामी आवश्यक आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

०१. निशाणी क्र ५९ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. वादींनी दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र ५ अनिल लक्ष्मण देशपांडे यांच्या नावासमोर मयत लिहून अर्जात नमुद कायदेशीर प्रतिनीधींची नावे दुरुस्तीने नमुद करावीत.

०३. वादींनी दुरुस्ती दाव्याची प्रत प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांच्या आत दाव्याच्याकामी सादर करावी.

MAHESH NARAYAN PATIL
Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL
Date: 2023.11.01 17:12:50 +0530

(एम. एन. पाटील)

दिनांक ०१/११/२०२३

४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

बमाळशिरस

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla (Grade III) |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 01 / 11 / 2023. |
| **Order uploaded on** | **:** | 01 / 11 / 2023. |